महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ७६३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. सुनील उमाशंकर पांडेय**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह),**
पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा, ता.जि.भंडारा

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,**
पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा, ता.जि.भंडारा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.०६.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०९.२०२१ | २९.१०.२०२१ | २१.११.२०२१ | २८.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २३.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "चालान नं. BDRCM २१०११२०३७७९ दि. ११.०९.२०२१ जो की बस नं. MH४० BL ४३१३ का है तथा मौदा टोल नाके के पास का है. ट्राफिक विभाग भंडारा पुलिस व्दारा किये गये बस के चालान जो ऊपर दिया गया है. इसमें ट्राफिक पोलीस ने १७९(१) के तहत किया है जो ट्राफिक पोलीस का आदेश नही मानने के कारण हुवा है. इसलिये कृपया मुझे निम्न जानकारी देने की कृपा करे. १) इस चालान में ट्राफिक कर्मचारी ने क्या आदेश दिये थे जो कि पालन नही किया गया विस्तार से लिखित बताने की कृपा करे." इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस ३ पानांच्या माहितीकरीता रु. ०६/- इतक्या शुल्काचा भरणा करण्याबाबत सुचीत केले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक २१.११.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम

अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २८.१२.२०२१ अन्वये, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशित करुन अपील निकाली काढले आहे. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.१२.२०२१ रोजी अपिलार्थीस ३ पानांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १६.०३.२०२२ रोजी** " ६८ दिवस विलंबाने माहिती मिळाली " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १६.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा प्र. पोलीस उपअधीक्षक (गृह), श्री. एस.एम. बंडीवर हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे त्यांचे प्रतिनिधी श्री. सौरभ घरडे, सहायक पोलीस निरीक्षक हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक २३.०९.२०२१ रोजी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी ३ पृष्ठांची माहिती सशुल्क प्राप्त करुन घेण्याबाबत दिनांक २९.१०.२०२१ रोजी पत्र निर्गमित केले असल्याचे नमूद केले आहे. वरील प्रतिसाद हा मिळाला नसल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक २१.११.२०२१ रोजी अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २८.१२.२०२१ अन्वये, अपिलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेशित केले. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांना दिनांक २८.१२.२०२१ रोजी एकूण ३ पृष्ठांची माहिती प्रदान करण्यात आलेली आहे. ती अपिलार्थी यांना दि.३१.१२.२०२१ रोजी प्राप्त झाली असल्याचे आढळून येते. त्यानंतर अपिलार्थी यांनी आयोगासमोर प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज सादर केला असून त्यात साधारणतः ६८ दिवसाच्या विलंबाने माहिती प्राप्त झाली असल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीबाबत एकूण ६/- रुपये शुल्क भरणा करण्याबाबत अर्ज प्राप्त झाल्यानंतर दिनांक २९.१०.२०२१ रोजी सुचीत केले आहे. मात्र किरकोळ शुल्क कळविण्याच्या संदर्भात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००८/प्र.क्र.

९३/०८/सहा(मा.अ.), दिनांक ०६ सप्टेंबर, २०१८ रोजी परिपत्रक जारी केलेले आहे. त्यात किरकोळ रकमेच्या मागणीपेक्षा प्रथम पत्रातच संबंधीतांना माहिती पुरविल्यास ते आर्थिकदृष्टया किफायतशीर ठरेलच शिवाय प्रशासकीय दृष्टयाही ते अधिक सोयीचे व मर्यादित मनुष्यबळ व संसाधनावरील ताण टाळणारे ठरु शकेल. तसेच सामान्य अर्जदारांसही त्यास हवी असणारी माहिती विनाविलंब पुरविण्याचा हेतू साध्य होईल, असे नमूद केलेले आहे. या परिपत्रकाचा संदर्भ देत माहिती आयोगाने २५/- रुपयापर्यंतची माहिती अर्जदारास विनामुल्य देण्याबाबत अनेक प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना निर्देशीत केलेले आहे. त्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामुल्य माहिती प्रदान केलेली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे. मात्र असे करीत असतांना सर्वच प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी यांनी साधारणत: २५/- रुपये शुल्कापर्यंतच्या कागदपत्रे ही जोडपत्र-अ प्राप्त होताच अर्जदारास तात्काळ प्रदान करण्याची प्रक्रिया करावी, याबाबत सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकाचे तंतोतंत पालन करावे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्थ असलेल्या अधिकाऱ्यांना याबाबत सुचना जारी करण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १०.०६.२०२४**

जावक क्रमांक ---EE9L0--- दिनांक ---5 SEP 2024---